दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। गुरुवार , दि. ०३ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १४७ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION



निलेश भाऊ गुरचळ यांना 'समाज रक्षक' पुरस्काराने सन्मानित

(पान २ वर)

» Selected

### मुंबईतील 4 हॉटेलांवर FDA ची मोठी कारवाई, परवाने निलंबित

**मुंबई :** मुंबईत अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चार हॉटेल व खाद्य आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) मोठी कारवाई केली आहे. तपासणीदरम्यान गंभीर त्रुटी आढळल्यानंतर दोन आस्थापनांचे अन्न परवाने तातडीने निलंबित करण्यात आले आहेत, तर अन्य दोन आस्थापनांवर परवाना निलंबित करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. FDA ने गोरेगाव येथील ईटक्लब ब्रँड्स प्रायव्हेट लिमिटेड आणि कुर्ला येथील राणी क्रिएटर्स कन्सल्टंट अँड सर्व्हिस प्रोव्हायडर्स यांचे अन्न परवाने तातडीने निलंबित केले आहेत. तर चेंबूर येथील गुडलक बेकरी अँड स्टोअर्स आणि अशफाक बेकरी येथेही स्वच्छतेच्या नियमांचे पालन होत नसल्याचे आढळले. त्यामुळे या दोन्ही आस्थापनांविरोधात परवाना निलंबित करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

## सरकारकडून पंधरा मागण्यांचा मसुदा; जरांगे यांचा संताप

# मसुदा नको, थेट 'जीआर' काढा; मनोज जरांगे आंदोलनावर ठाम

### "सरकार मराठा समाजाला फसवत आहे"; उपोषण सोडण्यास नकार; अंतरवाली सराटीत आंदोलन सुरूच

**छत्रपती संभाजीनगर/जालना**

मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटीत सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला बुधवारी नवे वळण मिळाले. सरकारकडून मंगळवारी जरांगे यांना विविध मागण्यांबाबतचा मसुदा देण्यात आला असला, तरी हा मसुदा मान्य नसल्याचे स्पष्ट करत जरांगे यांनी थेट शासन निर्णय अर्थात 'जीआर' काढण्याची मागणी केली. मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बुधवारी छत्रपती संभाजीनगर येथे सरकारची भूमिका स्पष्ट केली. मराठा आरक्षण



आणि अन्य मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असून, आंदोलकांकडे देण्यात आलेल्या मसुद्यावर जरांगे यांच्या प्रतिसादाची प्रतीक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जरांगे यांनी उपोषण सोडावे, असे आवाहनही केले.

मात्र, जरांगे यांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. "मसुदा आपण वाचलेला नाही. तब्येत खराब झाल्यावर, माणसे बेशुद्ध पडल्यानंतर तुम्ही येणार आणि वाचला का विचारणार. सरकार मराठा समाजाला फसवत आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली. "मसुदा नको, जीआर काढा; अन्यथा आम्ही मुंबईत यायला सज्ज आहोत," असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, सरकारकडून मंगळवारी जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना वाटाघाटीसाठी पाठवण्यात आल्याचा मुद्दाही जरांगे यांनी उपस्थित केला. गेल्या तीन वर्षांत वाटाघाटीसाठी हे अधिकारी कधीही आले नव्हते, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे सरकारच्या चर्चेच्या पद्धतीवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

जरांगे यांनी आपल्या प्रमुख मागण्यांमध्ये रद्द करण्यात आलेली प्रमाणपत्रे वैध करणे, कुणबी प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया सुरू करणे, सातारा-कोल्हापूर संस्थानासंदर्भातील 'जीआर' काढणे आणि हैदराबाद गॅझेटच्या आधारे प्रमाणपत्र वाटप सुरू करणे आदी मागण्यांचा पुनरुच्चार केला.

**आमदार प्रसाद लाड यांची भेट**

बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास आमदार प्रसाद लाड यांनी अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. सरकारच्या वतीने देण्यात आलेल्या पंधरा मागण्यांच्या मसुद्याबाबत त्यांनी जरांगे यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या आग्रहाखातर जरांगे यांनी पाणी घेतले असून, सलाइन लावून घेण्याची तयारीही दर्शविल्याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून तत्कालीन राजकीय नेतृत्वावरही निशाणा साधला. १९९४ मध्ये मंडल आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यानंतरच मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले असते, तर पुढील परिस्थिती निर्माण झाली नसती, असे ते म्हणाले. या निर्णयाचे राजकीय परिणाम आणि त्यासाठी जबाबदार कोण, असा सवाल करत त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव न घेता टोला लगावला.

एकीकडे सरकारकडून चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असताना दुसरीकडे जरांगे 'मसुदा नको, जीआर हवा' या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळे अंतरवाली सराटीतील आंदोलनाचा पुढील टप्पा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### प्रसाद लाड यांनी तांत्रिक मुद्दे मांडले

"सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियरच्या मागणीबाबत मी मनोज जरांगे दादा यांना सांगितलं होतं की, आपल्या हैदराबाद गॅझेटियरच्या निर्णयाला काही नतभ्रष्ट लोकांनी कोर्टामध्ये आव्हान दिलं होतं. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं सरकार आपल्या सर्वांच्या पाठीमागे आहे. ज्यावेळी हा निर्णय लागू केला तेव्हा राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ होते. विशेष वकील म्हणून साठे साहेबांना तिथे उभे केलं होतं. आज तेच मिलिंद साठे साहेब राज्याचे महाधिवक्ता आहेत."

# जळगाव ड्रग्ज कनेक्शन थेट यूपीपर्यंत; २०० कोटींचा मुद्देमाल जप्त!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | जळगावातून जप्त करण्यात आलेल्या एमडी ड्रग्जच्या साठ्याचा तपास करताना पोलिसांना या अमली पदार्थांच्या रॅकेटचे धागेदोरे थेट उत्तर प्रदेशापर्यंत पोहोचल्याचे समोर आले आहे. या तपासाच्या आधारे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखेने प्रयागराजमध्ये मोठी कारवाई करत एमडी ड्रग्ज तयार करणारा कथित कारखाना उद्ध्वस्त केला.**

या कारवाईमुळे महाराष्ट्रातून उत्तर प्रदेशापर्यंत पसरलेल्या अमली पदार्थांच्या नेटवर्कचा पर्दाफाश झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.

जळगावातून काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणावर एमडी ड्रग्जचा साठा जप्त करण्यात आला होता. या कारवाईनंतर पोलिसांनी ड्रग्जचा पुरवठा, निर्मिती आणि वितरणाची साखळी शोधण्यासाठी तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांचे पथक उत्तर प्रदेशातील प्रयागराजपर्यंत पोहोचले. तेथे संशयित ठिकाणी छापा टाकत एमडी ड्रग्ज निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला. या कारवाईत आतापर्यंत २१ संशयित तस्करांना अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच या संपूर्ण कारवाईत सुमारे २०० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे जळगावातील ड्रग्ज प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे.

**जळगावच्या धाग्याने यूपीतील कारखाना गाठला**

जळगावातून जप्त करण्यात आलेल्या एमडी ड्रग्जचा स्रोत नेमका कुठे होता, त्याची निर्मिती कुठे होत होती आणि महाराष्ट्रातील विविध भागांत त्याचा पुरवठा कोणामार्फत केला जात होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू होता. या तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रयागराजमध्ये कारवाई करण्यात आली. तेथे ड्रग्ज निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचा आणि इतर मुद्देमालाचा शोध घेण्यात आला. पोलिसांच्या या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या तस्करीमागे कार्यरत असलेल्या मोठ्या नेटवर्कचा तपास आता अधिक व्यापक होण्याची शक्यता आहे. अटक करण्यात आलेल्या संशयितांची चौकशी करून या रॅकेटमधील अन्य व्यक्ती, पुरवठादार आणि आर्थिक व्यवहारांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**जळगाव कनेक्शनची पाळेमुळे किती खोल?**

जळगावातून सुरू झालेला तपास थेट प्रयागराजपर्यंत पोहोचल्याने जिल्ह्यातील ड्रग्ज नेटवर्कबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. एमडी ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या साखळीतील आणखी किती जणांचा सहभाग आहे, ड्रग्जची निर्मिती नेमकी कुठे-कुठे केली जात होती आणि या रॅकेटमागे मोठे आर्थिक नेटवर्क आहे का, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपींची चौकशी आणि पुढील तपासातून ड्रग्ज तस्करीचे आणखी धक्कादायक धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जळगावसह महाराष्ट्रातील ड्रग्जविरोधी कारवाईला या तपासामुळे मोठी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

## "त्या ठेकेदाराला विद्युत दाहिनीत जिवंत जाळणार!"

### भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविकेच्या वक्तव्याने खळबळ

**जन सम्राट टाईम्स**

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका आणि माजी उपमहापौर शैलजा मोरे यांच्या एका वक्तव्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये नादुरुस्त असलेल्या विद्युत दाहिन्यांच्या प्रश्नावरून प्रशासनाला धारेवर धरताना मोरे यांनी संबंधित ठेकेदारांवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. यावेळी त्यांनी, "सुधारणा झाली नाही तर त्या ठेकेदाराला विद्युत दाहिनीत जिवंत जाळणार," असे संतप्त विधान केल्याचे समोर आले आहे. या वक्तव्याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.



महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील स्मशानभूमींमध्ये विद्युत दाहिन्यांची दुरवस्था असल्याचा मुद्दा शैलजा मोरे यांनी उपस्थित केला. या दाहिन्या वारंवार नादुरुस्त होत असून, त्याबाबत प्रशासनाकडे अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, तक्रारी करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत महापालिका आयुक्तांनाही पत्र दिल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले.

नागरिकांच्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा संताप व्यक्त करत मोरे यांनी संबंधित ठेकेदारांची नावे जाहीर करण्याची मागणी केली. दुरुस्तीची कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने होत नसतील तर संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. याच संतापाच्या भरात त्यांनी ठेकेदाराला विद्युत दाहिनीत जिवंत जाळण्याचे वक्तव्य केले.

"हा प्रश्न मार्गी लागला नाही, तर पुढच्या वेळी प्रशासनाचा निषेध करावा लागेल," असेही त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी तसेच मृत व्यक्तींच्या अंत्यसंस्काराशी संबंधित असलेल्या स्मशानभूमीतील सुविधांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सभागृहात अधोरेखित केले. विद्युत दाहिनी बंद पडल्यास मृतांच्या नातेवाईकांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

### स्वामी समर्थ मठातून पादुकांची चोरी, भाविकांमध्ये संताप

**खालापूर |** राज्यात चोरीच्या घटना वाढू लागल्या आहेत. घर, बंगल्यानंतर आता मंदिरातही चोरीच्या घटना घडू लागल्या आहेत. मागील अनेक वर्षांत मंदिरातून मूर्ती, दानपेटी चोरीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. आता थेट चांदीच्या पादुका चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.

स्वामी समर्थ मठातून चक्क चांदीच्या पादुका चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. रायगडमधील खालापूर शहरात हा प्रकार घडला आहे. खालापुरातील स्वामी समर्थ मठातून पादुका चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. शहरातील नव्याने बांधण्यात आलेल्या स्वामी समर्थ मठातून चक्क चांदीच्या पादुका चोरीला गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.


# शिवसेना पक्षघटनेतील २०१८ चा बदलच वादाच्या केंद्रस्थानी

### शिंदे गटाचा सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद; अ‍ॅड. नीरज किशन कौल यांचा दावा

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी** शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्हाच्या वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीदरम्यान शिंदे गटाने २०१८ मध्ये करण्यात आलेल्या शिवसेना पक्षघटनेतील बदलांवर जोरदार आक्षेप घेतला. शिंदे गटाचे ज्येष्ठ वकील अ‍ॅड. नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद करताना या घटनादुरुस्तीमुळे पक्षातील अधिकार एका व्यक्तीभोवती केंद्रित झाले आणि पक्षाची लोकशाही रचना कमकुवत झाल्याचा दावा केला.

कौल यांच्या युक्तिवादानुसार, निवडणूक आयोगाच्या सूचनेनंतर १९९९



मध्ये शिवसेनेने लोकशाही मूल्यांवर आधारित पक्षघटना तयार केली होती. मात्र, २०१८ मध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे या संरचनेत मोठा बदल झाला. पक्षातील व्यापक अधिकार पक्षप्रमुखांकडे केंद्रित करण्यात आले. परिणामी सामान्य कार्यकर्ते आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या निर्णय प्रक्रियेतील सहभागाला मर्यादा आल्याचा युक्तिवाद शिंदे गटाकडून करण्यात आला.

**पदाधिकाऱ्यांच्या निवडीवरही आक्षेप**

२०१८ च्या बदललेल्या पक्षघटनेनुसार शिवसेनेतील महत्त्वाच्या पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या. मात्र, या नियुक्त्या पक्षांतर्गत निवडणूक प्रक्रियेतून झाल्या नसल्याचा दावा कौल यांनी न्यायालयासमोर केला. त्यामुळे पक्षातील निर्णयप्रक्रिया कितपत लोकशाही पद्धतीने चालत होती, हा प्रश्नही सुनावणीत उपस्थित करण्यात आला. या प्रकरणात २०१८ ची सुधारित पक्षघटना निवडणूक आयोगाकडे अधिकृतपणे नोंदविण्यात आली होती का, हाही महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. ठाकरे गटाकडून या बदलांची माहिती आयोगाला देण्यात आल्याचा दावा करण्यात येत असला, तरी आयोगाच्या उपलब्ध नोंदींमध्ये सुधारित घटना अधिकृतपणे नोंद झाल्याचे दिसत नसल्याचा युक्तिवाद शिंदे गटाकडून करण्यात आला.

**'लोकशाही पक्षरचना बदलली'**

शिंदे गटाच्या म्हणण्यानुसार, १९९९ मध्ये निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार स्वीकारलेल्या पक्षघटनेत सामूहिक निर्णयप्रक्रियेला महत्त्व होते. त्यानंतर २०१८ मध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे पक्षातील अधिकारांचे केंद्रीकरण झाले. त्यामुळे पक्षाची मूळ लोकशाही रचना बदलली, असा दावा न्यायालयात करण्यात आला. दरम्यान, शिवसेना पक्षातील फुटीनंतर पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्ह कोणत्या गटाला मिळावे, यावर निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयाविरोधातील कायदेशीर लढाई सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# आदिवासी विकासमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी नाशिकमध्ये 'उलगुलान'!

### दहा हजारांवर आदिवासी बांधवांचा महामोर्चा; आश्रमशाळांतील गैरव्यवस्था व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर सरकारविरोधात संताप

**जन सम्राट टाईम्स**

**नाशिक | प्रतिनिधी:** 'बिरसा मुंडांचा एकच उलगुलान... उलगुलान', 'लडेंगे... जितेंगे', 'एक तीर, एक कमान... सारे आदिवासी एक समान' अशा आक्रमक घोषणांनी नाशिकचा परिसर बुधवारी दणाणून गेला. आदिवासी विकास विभागाच्या कारभाराविरोधात आणि आदिवासी विकासमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दहा हजारांहून अधिक आदिवासी बांधव, विद्यार्थी, पालक आणि कार्यकर्त्यांनी 'उलगुलान' महामोर्चा काढला. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

राज्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांसह आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे मृत्यू, वसतिगृहांतील समस्या, विद्यार्थ्यांची



सुरक्षा आणि आदिवासी विकास विभागाच्या कारभाराबाबत गेल्या काही दिवसांपासून नाराजी व्यक्त होत आहे. या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन पुकारण्यात आले होते. गेल्या पंधरा दिवसांपासून नाशिकमधील ईदगाह मैदानावर आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर बुधवारी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले. त्र्यंबक रोडवरील ईदगाह मैदानापासून मोर्चाला सुरुवात झाली. जिल्हा परिषद, शालिमार, महात्मा गांधी रोड, जिल्हाधिकारी कार्यालय आणि जुना सीबीएस मार्गे हा जनसागर आदिवासी विकास भवनाकडे रवाना झाला. हातात मागण्यांचे फलक, डोक्यावर आदिवासी संस्कृतीचे प्रतीक असलेले साहित्य आणि सरकारविरोधातील घोषणांनी संपूर्ण मार्गावरील वातावरण तापले होते.

**राजीनाम्याची मागणी**

आदिवासी विकास विभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलकांनी आदिवासी विकासमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. "जोपर्यंत राजीनामा होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही," असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला. मागण्या मान्य न झाल्यास नाशिकमधील हा जनसागर मुंबईकडे वळवू, असा इशाराही देण्यात आला. मोर्चाला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार विजय वडेट्टीवार आणि माजी मंत्री वसंत पुरके यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. तसेच सुधाकर राऊत, प्रशांत गावंडे, ललित चौधरी, तुळशीराम खोटरे, लक्ष्मी जाधव यांच्यासह राज्यभरातील आदिवासी विद्यार्थी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**आयुक्तांनी स्वीकारले निवेदन**


मोर्चा आदिवासी विकास भवनासमोर पोहोचल्यानंतर आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी आंदोलनस्थळी येत आंदोलकांची भेट घेतली. त्यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारून त्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

# आमदार गोपीचंद पडळकरांना जाब विचारणाऱ्या संतोष पंडित यांना अटक

**जन सम्राट टाईम्स**

**पुणे | प्रतिनिधी :** पुण्यातील कोथरूड परिसरात सोशल मीडिया आणि विकासकामांवरील प्रश्नांमुळे चर्चेत असलेले युट्युबर संतोष पंडित यांना पोलिसांनी अटक केल्याने शहरात खळबळ उडाली आहे. सोशल मीडियावर आक्षेपार्ह व बदनामीकारक व्हिडिओ प्रसारित केल्याच्या आरोपावरून कोथरूड पोलिसांनी ही कारवाई केली. ३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री सुमारे एक वाजता पोलिसांनी पंडित यांना ते राहत असलेल्या ठिकाणाहून ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

संतोष पंडित यांनी त्यांच्या युट्युब अकाउंटवरून मंत्री चंद्रकांत पाटील आणि मिताली साळवेकर यांच्याबाबत कथित आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित केल्याचा आरोप आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून संबंधित व्यक्तींची बदनामी करण्यात आल्याची तक्रार कोथरूड पोलिसांकडे करण्यात



आली होती. सारिका कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी या प्रकरणाची नोंद करून पुढील कारवाई केली. पंडित यांच्या युट्युब अकाउंटवर प्रसिद्ध झालेला संबंधित व्हिडिओ मोठ्या प्रमाणात पाहिला गेल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर या प्रकरणाने वेग घेतला. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पंडित यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. या प्रकरणातील नेमके स्वरूप, व्हिडिओमधील मजकूर आणि त्यामागील उद्देश याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

विशेष म्हणजे, अटकेच्या आदल्या दिवशीच संतोष पंडित यांनी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांना त्यांच्या कारच्या नंबर प्लेटवरून जाब विचारणारा व्हिडिओ केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पंडित यांच्या अटकेनंतर सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आले आहे. मात्र, या दोन्ही घटनांचा परस्पर संबंध असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केलेले नसून, सध्या आक्षेपार्ह व बदनामीकारक व्हिडिओप्रकरणी झालेल्या तक्रारीच्या आधारेच कारवाई करण्यात आल्याचे समोर येत आहे.

# जिद्दीचा विजय! बदनामी, टोमणे आणि संघर्षावर मात करत भंडारा जिल्ह्यातील शंकर नागपुरे बनले नागपूर जिल्हा परिषदेत शिक्षक!

## पवित्र पोर्टलमधून नागपूर जिल्हा परिषदेत सहायक शिक्षकपदी निवड; प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उभारली यशोगाथा

जन सम्राट टाईम्स

**नागपूर | प्रतिनिधी**

"आयुष्याचा संघर्ष खूप रडवितो, पण प्रामाणिक कष्टाची साथ असेल तर यश नक्कीच मिळते," हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे भंडारा जिल्ह्यातील खैरना गावच्या शंकर नागपुरे यांनी. गावातील लोकांचे टोमणे, भरती प्रक्रियेतील घोटाळ्यामुळे झालेली नशिबाची कोंडी आणि मानसिक त्रासातून तावून-सुलाखून निघत शंकर नागपुरे यांची ऑगस्ट २०२६ मध्ये पवित्र पोर्टल मार्फत नागपूर जिल्हा परिषदेत 'सहायक शिक्षक' पदी निवड झाली आहे. त्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आणि डोळ्यात पाणी आणणारा आहे.

### वयाच्या लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेल्या छोट्याशा खैरना गावातील शंकर नागपुरे यांची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत बेताची होती. १९९५ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात ५ मुली आणि १ मुलगा (शंकर) अशा ६ अपत्यांची संपूर्ण जबाबदारी आईवर आली. आईने अपार कष्ट करून कुटुंबाचा गाडा चालवला. शंकर यांच्या शिक्षणासाठी आणि बहिणींच्या लग्नासाठी शेतीसुद्धा विकावी लागली. अशा बिकट परिस्थितीतही शंकर यांनी जिद्द सोडली नाही आणि २०१२ मध्ये त्यांनी डी.एड. परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करून उत्तीर्ण झाला. २०१४ मध्ये त्यांची अहिल्यानगर (अहमदनगर) येथे शिक्षक म्हणून नियुक्ती झाली.

### यशाच्या शिखरावरून थेट बदनामीच्या खाईत

शिक्षकाची नोकरी करत असतानाच शंकर यांनी अभ्यास




सुरू ठेवला. त्यांच्या कष्टाला २०१७ मध्ये मोठे यश आले, जेव्हा त्यांची SSC CGL मार्फत आयकर निरीक्षक (Income Tax Inspector) म्हणून

> ▮ **शंकर नागपुरे यांच्या मते :-** **"टोमणे व बदनामी तेच लोक करतात ज्यांची स्वतःच्या मुला - मुलींना योग्य शिक्षण देण्याचे लायकी नसते व सरकारी नोकरी तयारी करण्याची कुवत नसते."**

निवड झाली. संपूर्ण गावात कौतुक झाले, पण हे सुख फार काळ टिकले नाही. दुर्दैवाने, त्या भरती प्रक्रियेत मोठा गोंधळ आणि घोटाळा उघडकीस आला. यामुळे नशिबाने साथ सोडली आणि त्यांची निवड प्रक्रिया रद्द झाली.

यानंतर गावातील काही संकुचित प्रवृत्तीच्या लोकांनी शंकर यांची मोठी बदनामी सुरू केली. "खोटं बोलून नोकरी मिळवली" असे म्हणत लोकांनी टोमणे मारणे सुरू केले. या मानसिक छळाला आणि बदनामीला कंटाळून शंकर इतके खचले की, त्यांनी शेवटच्या टोकाचा (आत्महत्येचा) विचारही केला होता. परंतु, "माझ्या मागे माझ्या वृद्ध आईचे काय होईल?" या एका विचाराने त्यांनी स्वतःला सावरले आणि गाव सोडून नागपूर गाठले.

### नागपुरात नवा संघर्ष आणि जोडीदाराची साथ

नागपूर येथे आल्यानंतर त्यांनी एका खासगी शाळेत शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली आणि स्वतःचा अभ्यासही सुरू ठेवला. यादरम्यान, गावातीलच एका मुलीसमोर त्यांनी आपले दुःख व्यक्त केले. त्या मुलीने शंकर यांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून त्यांचा हात पकडण्याचे ठरवले. २०२५ मध्ये दोघांचा विवाह झाला.

लग्नानंतरही गावातील लोकांकडून होणारी चिखलफेक आणि बदनामी थांबली नव्हती. मात्र, अशा कठीण काळातही त्यांच्या पत्नीने खंबीर साथ दिली. दोघांनीही खासगी क्षेत्रात काम करत, पोटाला चिमटा काढून अभ्यास जारी ठेवला.

### कठीण काळात 'या' सुहृदांनी दिली मोलाची साथ

गावातील एका मोठ्या वर्गाने जरी पाठ फिरवली आणि बदनामी केली, तरी शंकर यांच्या पाठीशी त्यांचे हक्काचे लोक खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्या या संपूर्ण संघर्षाच्या काळात त्यांची आई, पाचही बहिणी आणि भाचा पवन मांढरे यांनी त्यांना मानसिक बळ दिले.

तसेच गावातील विश्वासू मित्र आणि हितचिंतक तुळशीदासजी बुरडे (सध्याचे सरपंच), गुरुदेवजी भानारकर, प्रशांत फाये, भूमीनाथ दिघोरे, सुभाष भानारकर, अतुल मेश्राम,ज्ञानेश्वर नान्हे,माणिक पचारे आणि गणेश मेश्राम यांनी शंकर यांच्या प्रामाणिकपणावर पूर्ण विश्वास ठेवला. या सर्वांनी केवळ मानसिक आधारच दिला नाही, तर ऐन अडचणीच्या काळात आर्थिक मदतीचा हात देऊन शंकर यांना पुन्हा उभे राहण्यासाठी मोठी ताकद दिली.

### अखेर 'पवित्र पोर्टल'ने मिळवून दिला न्याय

शंकर यांच्या अविरत संघर्षाला अखेर २०२६ मध्ये यश आले. महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टल मार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत त्यांनी घवघवीत यश संपादन केले. ऑगस्ट २०२६ मध्ये त्यांची जिल्हा परिषद नागपूर येथे 'सहायक शिक्षक' म्हणून अधिकृत निवड झाली आहे. गावाने नाकारलेल्या आणि टोमणे मारलेल्या शंकर नागपुरे यांनी आपल्या कष्टाच्या आणि प्रामाणिकपणाच्या बळावर मिळवलेले हे यश, नकारात्मकता पसरवणाऱ्यांच्या तोंडावर चपराक मारणारे आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वसामान्य स्तरातून आणि सुजाण नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# श्रीछत्रपतीशिवाजीमहाराजगणेशमित्र मंडळाच्या अध्यक्षपदी सौरभ चौधरी

## आझाद चौकातील मंडळाची नवीन कार्यकारिणी जाहीर




जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी** : शहरातील आझाद चौक परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज गणेश मित्र मंडळाच्या नवीन कार्यकारिणीची निवड नुकत्याच झालेल्या सभासदांच्या बैठकीत सर्वानुमते करण्यात आली. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या बैठकीत उत्सवाचे नियोजन, धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, युवकांचा सहभाग तसेच परिसरातील नागरिकांना उत्सवाशी जोडून घेण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सौरभ चौधरी यांची मंडळाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. महेश चौधरी (भोला) यांच्यावर उपाध्यक्षपदाची, तर प्रसाद चौधरी यांच्यावर सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. बापू मराठे आणि मनोज चौधरी (बंटी) यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीची घोषणा होताच उपस्थित सभासद, युवक आणि गणेशभक्तांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. अनुभवी कार्यकर्त्यांची सल्लागार समिती मंडळाच्या सल्लागार समितीत सोनू मराठे, छोटू वाणी, योगेश सुदाम चौधरी, गणेश बारी, विकास चौधरी, विपुल चौधरी, विकी गोसावी, सचिन शालिक चौधरी, गोलू, रवींद्र चौधरी, गोपाल चौधरी, गणेश चौधरी, जयेश, नितीन चौधरी, नाना ठाकूर, दर्शन बागुल, महेश चौधरी, स्वामी चौधरी, सोनू चौधरी, दीपक चौधरी, सचिन चौधरी, उज्वल चौधरी, योगेश राजेंद्र चौधरी आणि भावडू चौधरी यांचा समावेश करण्यात आला. यंदाचा गणेशोत्सव भव्यतेसोबतच शिस्तबद्ध, पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. उत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेसोबत सामाजिक एकोपा आणि सेवाभाव वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

---

# धुळे मध्यवर्ती बस स्थानकाला 'क्रांतीवीर खाज्या नाईक' यांचे नाव द्या

## बिरसा मुंडा क्रांती दलाची मागणी; विभागीय नियंत्रकांना निवेदन,

जन सम्राट टाईम्स

**धुळे | (प्रतिनिधी)**

धुळे शहरातील मध्यवर्ती बस स्थानकाला आदिवासी स्वातंत्र्यसंग्रामाचे महानायक क्रांतीवीर खाज्या नाईक यांचे नाव देण्यात यावे, अशी आग्रही मागणी बिरसा मुंडा क्रांती दलाच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दादाबाबा सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धुळे विभागाच्या विभागीय नियंत्रकांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, धुळे मध्यवर्ती बस स्थानक हे जिल्ह्यातील नागरिक, विद्यार्थी, कामगार आणि प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. खानदेशच्या भूमीला आदिवासी समाजाच्या शौर्य, स्वाभिमान आणि संघर्षाची समृद्ध परंपरा लाभली आहे. या ऐतिहासिक परंपरेचा गौरव करण्यासाठी स्थानिक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाला बस स्थानकाचे नाव देणे उचित ठरेल, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

१८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानाचा गौरव करण्याची मागणी १८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामासह १८५८च्या ऐतिहासिक अंबापाणीच्या लढ्यात क्रांतीवीर खाज्या नाईक यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिल्याचे



निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या शौर्य, बलिदान आणि ऐतिहासिक योगदानाची पुढील पिढीला ओळख व्हावी, यासाठी धुळे मध्यवर्ती बस स्थानकाला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर **दादाबाबा सोनवणे, गोविंदा अहिरे, पवनदादा वाघ, किशोर गायकवाड, नानाभाऊ महाले, देविदास सोनवणे, निशांत मोहिते, शाम मोरे, अनंत भिल, आनंद गांगुर्डे, भटू नाईक, राकेश गायकवाड, बंटी वाघ, किशोर मोरे, श्रीराम सोनवणे, भारत धुळेकर, अनिल मोरे, माधवराव मोरे, सुनील मोरे, अविनाश मोरे, शाम दावलकर आणि ॲड. नितीन म्हसदे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.**

> **▮ प्रमुख मागण्या :-**
> **▮ धुळे शहरातील मध्यवर्ती बस स्थानकाचे नाव अधिकृतपणे 'क्रांतीवीर खाज्या नाईक मध्यवर्ती बस स्थानक, धुळे' असे करण्यात यावे.**
> **▮ नामांतराचा प्रस्ताव संबंधित विभागामार्फत महाराष्ट्र शासनाकडे तातडीने पाठवावा.**
> **▮ बस स्थानकाच्या दर्शनी भागात क्रांतीवीर खाज्या नाईक यांचा भव्य स्मृतिफलक उभारावा.**
> **▮ स्मृतिफलकावर त्यांच्या जीवनकार्याची, १८५७च्या स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानाची आणि अंबापाणीच्या लढ्याची संक्षिप्त माहिती नमूद करावी.**
> **▮ स्थानिक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाचे नाव बस स्थानकाला दिल्यास नवीन पिढीला त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळेल. तसेच धुळे शहराची ऐतिहासिक ओळख अधिक समृद्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास बिरसा मुंडा क्रांती दलाने निवेदनातून व्यक्त केला आहे.**

---

# निलेश भाऊ गुरचळ यांना 'समाज रक्षक' पुरस्काराने सन्मानित

## सामाजिक बांधिलकी जपत विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी योगदान

जन सम्राट टाईम्स

**बोदवड । (प्रतिनिधी)** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजाप्रती असलेली बांधिलकी सातत्याने जपणारे निलेश भाऊ गुरचळ यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत प्रतिष्ठेचा 'समाज रक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्याचा गौरव करत उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच भविष्यातील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

बोदवड येथे आयोजित करण्यात आलेल्या या पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रांत सामाजिक योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. समाजातील गरजू घटकांना मदत, नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी पाठपुरावा तसेच सामाजिक प्रश्नांबाबत सातत्याने आवाज उठविणाऱ्या कार्यकर्त्यांच्या योगदानाची यावेळी दखल घेण्यात आली.

या सोहळ्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे जिल्हाध्यक्ष राजू भाऊ सूर्यवंशी, भीमराज सेनेचे राजू थाटे तसेच वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा युवक अध्यक्ष बाळा भाऊ पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते निलेश भाऊ




गुरचळ यांना 'समाज रक्षक' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

निलेश गुरचळ हे सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहून समाजातील विविध घटकांच्या अडचणी आणि प्रश्न जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे, गरजू व्यक्तींना आवश्यक ते सहकार्य करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे, अशा विविध माध्यमातून ते कार्यरत असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीची गरज असते. सामाजिक बांधिलकीची हीच भावना जपत निलेश गुरचळ यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक नागरिकांना मदतीचा हात मिळाला असून सामाजिक क्षेत्रात त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. 'समाज रक्षक' पुरस्कार मिळाल्याबद्दल निलेश भाऊ गुरचळ यांचे जिल्हाभरातून अभिनंदन करण्यात येत आहे. सामाजिक कार्याची दखल घेऊन मिळालेला हा सन्मान आगामी काळात अधिक जोमाने समाजसेवा करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

समाजातील गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि विविध सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा संकल्प निलेश गुरचळ यांनी यावेळी व्यक्त केला. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींच्या योगदानाचा अशा प्रकारे गौरव झाल्यास समाजसेवेची प्रेरणा अधिक व्यापक होण्यास मदत होईल, अशी अपेक्षाही उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

---

# नशिराबाद येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

## ज्ञानाची देवाणघेवाण, अनुभवांची सांगड आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी |** जिल्हा परिषद केंद्र शाळा नशिराबाद येथे सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. गटशिक्षणाधिकारी अजित तडवी, शिक्षणविस्तार अधिकारी विजय पवार आणि जितेंद्र चिंचोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत केंद्रातील शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध शैक्षणिक विषयांवर विचारांची देवाणघेवाण केली.

शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक केंद्र शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा खारे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्ष विजय पवार आणि केंद्रप्रमुख राहुल संसारे यांच्या हस्ते सरस्वती तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनींनी 'हंसवाहिनी सरस्वतीच्या' हे ईशस्तवन सादर केले. त्यानंतर 'स्वागतम् सुस्वागतम्, हा मानाचा मुजरा' या गीतावर विद्यार्थिनींनी आकर्षक नृत्य सादर करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी मार्गदर्शन करताना शिक्षणविस्तार अधिकारी विजय पवार यांनी ज्ञानाची देवाणघेवाण, शिक्षकांचे अनुभव आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांची सांगड घालण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवावेत, तसेच अध्यापन प्रक्रियेत नावीन्य आणावे, असे आवाहन त्यांनी केले. केंद्रप्रमुख राहुल संसारे यांनी 'मागील महिन्याचा आढावा' तसेच 'शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि समुदाय सहभाग' या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. शाळेच्या शैक्षणिक विकासात पालक आणि समुदायाचा सहभाग वाढविण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली. परिषदेत 'विचारांची देवाणघेवाण' या विषयावर जयश्री कांबळे, मीना गुळवे आणि विनोद नाईक यांनी अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. 'पाठाचे नियोजन व मासिक नियोजन' या विषयावर मंजू बारी आणि लोटन पवार यांनी शिक्षकांचा कृतीयुक्त सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. 'PGI अहवाल २०२५-२६' मधील विविध मुद्द्यांचे विश्लेषण कविता पाटील आणि वंदना बागुल यांनी केले. 'डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम' या विषयावर सुचिता वासनिक आणि जयश्री पगारे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. शिक्षण परिषदेत केंद्रातील सर्व शाळांचे प्रतिनिधित्व करणारी आकर्षक रांगोळी साकारण्यात आली. केंद्रप्रमुख राहुल संसारे यांच्या संकल्पनेतून 'एकात्मतेचे प्रतीक' म्हणून विविध शाळा रांगोळीच्या माध्यमातून एकत्रितपणे दर्शविण्यात आल्या. या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. शिक्षण परिषदेची सुंदर व्हिडिओ निर्मिती विजय निकम यांनी केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा सावकारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अविनाश पाटील यांनी केले. सुंदर फलक लेखन निलेश सपकाळे यांनी केले. शिक्षण परिषद यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रेखा खारे यांच्यासह शोभा डोळे, नीता कापडणे, कविता पाटील, विनोद जयकर आणि जितेंद्र चौधरी यांनी विशेष प्रयत्न केले.

अध्यक्षांच्या परवानगीने 'वंदे मातरम्' या गीताने शिक्षण परिषदेची सांगता झाली. शिक्षकांच्या ज्ञानवृद्धीसोबतच शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी अशा परिषदांचे आयोजन उपयुक्त ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

---

# वरखेडी तांडा शिवारात बिबट्याचा शेतकऱ्यावर हल्ला; शेतकरी गंभीर जखमी

जन सम्राट टाईम्स



**सोयगाव | प्रतिनिधी :** सोयगाव तालुक्यातील वरखेडी तांडा शिवारात शेत राखणीसाठी गेलेल्या शेतकऱ्यावर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची घटना सोमवारी रात्री घडली. रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास झालेल्या या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी झाला असून त्याच्या चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली आहे. जखमी शेतकऱ्यावर प्रथम पाचोरा ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी जळगाव येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेनंतर वरखेडी तांडा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वरखेडी तांडा येथील शेतकरी ज्ञानेश्वर वामन लहाने (वय ४४) यांची गट क्रमांक ६७ मध्ये शेती आहे. त्यांच्या शेतात कापूस तसेच केळीची लागवड करण्यात आली आहे. शेतातच बखार बांधून जनावरे ठेवण्यात येतात. तसेच पिकांची राखण करण्यासाठी लहाने हे अनेकदा रात्री शेतातच मुक्काम करतात. सोमवारी रात्री नेहमीप्रमाणे जेवण आटोपून ज्ञानेश्वर लहाने हे शेत राखणीसाठी गेले होते. रात्रीच्या सुमारास ते शेतात झोपले असताना अचानक बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याने केलेल्या हल्ल्यात त्यांच्या चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे घाबरलेल्या लहाने यांनी जोरात आरडाओरड केली.

त्यांचा आवाज ऐकून परिसरातील शेजारील शेतकरी घटनास्थळी धावून आले. शेतकऱ्यांची चाहूल लागताच बिबट्याने तेथून पळ काढला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र या हल्ल्यात ज्ञानेश्वर लहाने गंभीर जखमी झाले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# मलकापूर रेल्वे स्थानकाच्या डाउन साईडला तिकीट घर, वेटिंग रूमसह FOBची मागणी!

## पंतनगर, एकतानगर, फातिमानगर परिसरातील हजारो नागरिकांची गैरसोय; रेल्वे प्रशासनाकडे RPIचे निवेदन

जन सम्राट टाईम्स



**मलकापूर | प्रतिनिधी :** मलकापूर रेल्वे स्थानकाच्या डाउन साईडला स्वतंत्र तिकीट घर, प्रवाशांसाठी वेटिंग रूम तसेच प्लॅटफॉर्मवरून पादचारी पूल (FOB) उभारण्यात यावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) च्या वतीने करण्यात आली आहे. RPIचे तालुकाध्यक्ष भिवा भाऊ चोपडे यांच्या नेतृत्वाखाली २ सप्टेंबर रोजी भुसावळ विभागाच्या विभागीय रेल्वे प्रबंधकांकडे (DRM) निवेदन सादर करून प्रवाशांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले.

मलकापूर रेल्वे स्थानक हे शहरासह परिसरातील अनेक गावांसाठी महत्त्वाचे प्रवासी केंद्र आहे. मात्र, स्थानकाच्या डाउन साईडला राहणाऱ्या नागरिकांना रेल्वे प्रवासासाठी तिकीट काढताना मुख्य स्थानकाच्या अप साईडला जावे लागत असल्याने मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डाउन साईड परिसरात मुक्ताईनगर, कुऱ्हा, काकोळा यासह पंतनगर, एकतानगर, रेल्वे क्वार्टर्स आणि फातिमानगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. दररोज शिक्षण, नोकरी, व्यवसाय, उपचार तसेच अन्य कामांसाठी नागरिकांना रेल्वेने प्रवास करावा लागतो. मात्र, तिकीट खिडकीची सुविधा डाउन साईडला नसल्यामुळे प्रवाशांना अनावश्यक अंतर पार करावे लागते.

**महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि दिव्यांगांची अधिक गैरसोय**

विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, दिव्यांग व्यक्ती, रुग्ण तसेच लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या नागरिकांना या समस्येचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे RPIने निदर्शनास आणून दिले. डाउन साईडला स्वतंत्र तिकीट खिडकी आणि वेटिंग रूम उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांची गैरसोय कमी होण्याबरोबरच मुख्य रेल्वे स्थानकावरील गर्दीही कमी होण्यास मदत होईल, असा दावा निवेदनातून करण्यात आला आहे.,

**रेल्वे रुळ ओलांडण्याचा धोका टाळण्यासाठी FOBची मागणी**

डाउन साईड परिसरातील नागरिकांना बाजारपेठ, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि शासकीय कार्यालयांकडे ये-जा करताना रेल्वे मार्गामुळे अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पादचारी पूल (Foot Over Bridge) उभारणे अत्यंत आवश्यक असल्याचे RPIने म्हटले आहे.

FOB उभारल्यास पंतनगर, एकतानगर, रेल्वे क्वार्टर्स, फातिमानगर तसेच परिसरातील हजारो नागरिकांना रेल्वे रुळ ओलांडण्याचा धोका न पत्करता सुरक्षितपणे ये-जा करता येणार आहे. त्यामुळे या मागणीचा गांभीर्याने विचार करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

RPIने डाउन साईडला तिकीट घर व वेटिंग रूम सुरू करणे, FOBला मंजुरी देऊन त्याचे बांधकाम करणे, तसेच परिसरात प्रकाश व्यवस्था, पिण्याचे पाणी, आसन व्यवस्था आणि स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. रेल्वे प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक प्रस्ताव तयार करावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन लोकशाही व सनदशीर मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही RPIच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी तालुकाध्यक्ष भिवा भाऊ चोपडे, शहराध्यक्ष अशोक भालशंकर, तालुका उपाध्यक्ष मुख्तार खान, तालुका सचिव कादर शेख करीम शेख, रफीक साहेब, अंकित दादा चोपडे, असित भैय्या इंगळे, जुबेर खान यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# 'समृद्धी'वर मध्यरात्री पुन्हा लुटीची मालिका

जन सम्राट टाईम्स

**सिन्नर | प्रतिनिधी :** समृद्धी महामार्गावर गुरुवारी मध्यरात्री सिन्नर तालुक्यात लुटमारीच्या घटनांची मालिका घडल्याचे समोर आले आहे. नांदेडचे कार व्यावसायिक मोहम्मद फरान आणि छत्रपती संभाजीनगरचे ॲड. श्रीकांत मिश्रा यांच्यानंतर गंभीर रुग्णाला मुंबईला उपचारासाठी घेऊन जाणाऱ्या हिंगोलीतील प्रवाशांची कारही दरोडेखोरांनी अडवली. रस्त्यावर टणक वस्तू फेकून कार थांबविल्यानंतर चालकासह दोघांना मारहाण करून रोख रकमेसह सोन्याची अंगठी असा सुमारे एक लाख रुपयांचा ऐवज लुटण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. रुग्णाची प्रकृती लक्षात घेऊन प्रवाशांनी प्रथम त्याला मुंबईला नेले. उपचाराची व्यवस्था केल्यानंतर शनिवारी वावी पोलिस ठाण्यात येऊन फिर्याद दिली.

हिंगोली तालुक्यातील दाटेगाव येथील पांडुरंग माने हे एर्टिगा कारने अपघातात जखमी झालेल्या अर्जुन खरात यांना मुंबईतील केईएम रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जात होते. कारमध्ये अर्जुन खरात यांची आई बेबीबाई, भाऊ ओंकार आणि चालक मित्र किरण खंदारे होते. गुरुवारी मध्यरात्री सुमारे १२.४० वाजता कार दुसंगवाडी-मलढोण शिवारातून जात असताना दुभाजकाच्या कडेला दबा धरून बसलेल्या दरोडेखोरांनी रस्त्यावर टणक वस्तू फेकली. कार त्या वस्तूवरून जाताच इंजिनचे चेंबर फुटून तेल गळू लागले. त्यामुळे कार रस्त्याच्या कडेला थांबवून माने आणि खंदारे पाहणी करीत असतानाच पाच ते सहा जणांनी त्यांना घेरले. काही क्षणांतच आणखी सात ते आठ दरोडेखोर लोखंडी गज आणि काठ्या घेऊन तेथे आले. 'गाडीत गंभीर रुग्ण आहे, मारहाण करू नका,' अशी विनंती करूनही दरोडेखोरांनी दोघांना मारहाण केली. माने यांच्याकडील ३५ हजार ५०० रुपये, खंदारे यांच्याकडील ७ हजार ३०० रुपये आणि पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा ऐवज हिसकावून घेत दरोडेखोर सायाळे रस्त्याच्या दिशेने पसार झाले. घटनेनंतर पोलिस गस्ती पथक घटनास्थळी पोहोचले. याच ठिकाणी काही वेळापूर्वी ॲड. श्रीकांत मिश्रा यांनाही लुटल्याची माहिती पोलिसांनी माने यांना दिली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# सिंहस्थात 25 हजार कोटींची उधळपट्टी

## संजय राऊत यांचा मंत्री-अधिकाऱ्यांवर आरोप

जन सम्राट टाईम्स



**नाशिक | प्रतिनिधी :** नाशिकमध्ये होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असून, कुंभमेळ्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या ३५ हजार कोटी रुपयांच्या बजेटपैकी तब्बल २५ हजार कोटी रुपये कुंभमेळा मंत्री आणि अधिकारी मिळून उधळणार असल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला. नाशिककरांनी मुख्यमंत्र्यांच्या मेळाव्यावर आणि त्यांच्या भाषणावर बहिष्कार टाकल्याचे दिसून येते, असा दावाही राऊत यांनी केला. लोकांनी मुख्यमंत्र्यांकडे गांभीर्याने पाहणे सोडले आहे, अशी टीकाही त्यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. २८) झालेल्या 'सिंहस्थ महाकुंभ भक्तिसंगम' कार्यक्रमातील गर्दीवरून राऊत यांनी टीका केली.

नाशिकमधील कार्यक्रमाबाबत मुख्यमंत्र्यांवर टीका करणाऱ्या संजय राऊत यांच्यावर महापौर हिमगौरी आहेर-आडके यांनी प्रत्युत्तर दिले. राऊत स्वतः कार्यक्रमाला उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांच्यापर्यंत चुकीची माहिती पोहोचविण्यात आली आहे, असे त्या म्हणाल्या. मुळात 'भक्ती संगम' कार्यक्रम सिंहस्थ प्राधिकरणाचा होता. या कार्यक्रमासाठी साधू-महंतांसह विशिष्ट निमंत्रितांनाच आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी पास देण्यात आले होते. तसेच जास्तीच्या खुर्च्या रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी ठेवल्या होत्या. त्यामुळे राऊत यांचे विधान अर्धवट माहितीच्या आधारे आहे, असा आरोप महापौर आहेर-आडके यांनी केला. कुंभमेळ्यासंदर्भात अशा प्रकारचे ट्वीट करणे अयोग्य आहे. कुंभमेळ्याच्या कार्यक्रमांना बदनाम करण्याचे षडयंत्र ठाकरे गटाने थांबवावे, असे आवाहनही महापौरांनी केले.

**संजय राऊत म्हणाले...**

- कुंभमेळ्यातील कथित भ्रष्टाचारावर केवळ विरोधकच नव्हे, तर साधू-संतही उघडपणे बोलू लागले आहेत
- नाशिकमधील विकासकामांमध्ये कोणतेही नियोजन नाही
- सरकारला नाशिकमधील खड्डे दिसत नाहीत का? या खड्ड्यांमुळे झालेले मृत्यू दिसत नाहीत का ?
- केवळ निविदा काढणे व कंत्राटदारांना कामे देणे एवढेच सरकारचे काम, त्यामुळे नाशिककरांचे हाल होत आहेत.
- दहा वर्षांपूर्वी नाशिक दत्तक घेतल्याचे फडणवीस विसरले आहेत. शहराची दुर्दशा झाली आहे.

# धुळे एकलव्य आदिवासी संघटनेची पाचोरा येथे तालुका बैठक उत्साहात

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा

जन सम्राट टाईम्स



**पाचोरा | प्रतिनिधी :** एकलव्य आदिवासी संघटनेची तालुका बैठक १ सप्टेंबर २०२६ रोजी पाचोरा येथील शासकीय श्रमगृहात उत्साहात पार पडली. संघटनेच्या वतीने आगामी काळात विविध सामाजिक उपक्रम राबविणे, तसेच राज्यभरात आदिवासी विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीनंतर संघटनेच्या वतीने पाचोरा प्रांत अधिकारी तसेच तहसीलदार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

एकलव्य आदिवासी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुधाकर वाघ, जिल्हाध्यक्ष एकनाथ आहिरे तसेच तालुकाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक घेण्यात आली. पाचोरा तालुक्यातील विविध गाव, खेडी, तांडे आणि आदिवासी वस्त्यांमधून संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. त्यामुळे बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बैठकीच्या प्रारंभी संघटनेच्या आगामी सामाजिक कार्याचा आढावा घेण्यात आला. आदिवासी समाजातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, विद्यार्थ्यांचे प्रश्न, शैक्षणिक अडचणी तसेच समाजाच्या हक्कांबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत चर्चा झाली. समाजातील युवक, महिला आणि विद्यार्थ्यांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. राज्यभरात आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाबाबतही बैठकीत चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका संघटनेने मांडली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला एकलव्य आदिवासी संघटनेचा ठाम पाठिंबा असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. बैठकीनंतर संघटनेच्या शिष्टमंडळाने पाचोरा प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.


यावेळी संस्थापक अध्यक्ष सुधाकर वाघ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आदिवासी समाजाने आपल्या हक्क आणि अधिकारांबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. संघटितपणे आपल्या प्रश्नांचा पाठपुरावा केल्यास शासन व प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले. जिल्हाध्यक्ष एकनाथ आहिरे यांनीही आदिवासी समाजाला त्यांच्या घटनात्मक हक्कांची आणि विविध शासकीय योजनांची माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगितले. समाजातील प्रत्येक घटकाने संघटनेच्या माध्यमातून एकत्र येऊन सामाजिक विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. तालुकाध्यक्षांनी मनोगत व्यक्त करून आगामी काळातील संघटनेच्या कार्याची दिशा स्पष्ट केली. या बैठकीस पाचोरा तालुक्यातील विविध गावांमधून आलेले आदिवासी समाजबांधव, महिला, युवक, विद्यार्थी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीमुळे संघटनेच्या आगामी सामाजिक व संघटनात्मक कार्याला नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# बॅनर बांधताना तरुणाचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू

## २१ वर्षीय चेतन सूर्यवंशीचा उपचारादरम्यान मृत्यू

जन सम्राट टाईम्स

**कार्यक्रमाचे बॅनर लावताना विद्युत तारांचा धक्का; शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद**



**धुळे | प्रतिनिधी :** शहरातील स्टेशन रोड परिसरात कार्यक्रमाचे बॅनर बांधत असताना २१ वर्षीय तरुणाला विजेचा जोरदार धक्का लागून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मध्यरात्री घडली. या घटनेमुळे स्टेशन रोड परिसरात खळबळ उडाली असून, तरुणाच्या अकाली मृत्यूने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.

जुने धुळे परिसरातील चेतन गोपाल सूर्यवंशी (वय २१) हा तरुण स्टेशन रोड भागात एका कार्यक्रमासाठी बॅनर बांधण्याचे काम करीत होता. बॅनर लावत असताना त्याचा विद्युत तारांशी संपर्क आल्याने त्याला अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. या दुर्घटनेत तो गंभीररीत्या जखमी होऊन खाली कोसळला. घटना लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी चेतन याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.

स्टेशन रोडसारख्या वर्दळीच्या परिसरात मध्यरात्री ही घटना घडल्याने काही वेळातच नागरिकांची मोठी गर्दी घटनास्थळी जमली होती. तरुणाचा मृतदेह पाहून कुटुंबीयांनी आक्रोश केला. चेतनच्या अकाली निधनामुळे नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, बॅनर, होर्डिंग अथवा विद्युत सजावटीची कामे करताना सुरक्षिततेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा मुद्दा या घटनेनंतर पुन्हा चर्चेत आला आहे. शहरातील विविध भागांमध्ये कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात बॅनर, फलक आणि सजावटीचे साहित्य लावले जाते. मात्र, अशा वेळी विद्युत तारांपासून आवश्यक अंतर राखणे, सुरक्षित उपकरणांचा वापर करणे आणि कामगारांच्या सुरक्षेची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

चेतनच्या मृत्यूमुळे सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. या दुर्घटनेमागे नेमकी परिस्थिती काय होती, बॅनर लावताना आवश्यक सुरक्षितता उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, तसेच विद्युत तारांचा धोका लक्षात घेण्यात आला होता का, याबाबत संबंधित यंत्रणांकडून तपास केला जाण्याची शक्यता आहे. शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आल्याची प्राथमिक माहिती असून, पोलिसांकडून घटनेची पुढील चौकशी सुरू आहे. दरम्यान, चेतन सूर्यवंशी याच्या अकाली निधनाने जुने धुळे आणि स्टेशन रोड परिसरात शोक व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्री नाशिकला येताच रस्ते 'टकाटक'; भुजबळांचा फडणवीसांना मिश्कील टोला

जन सम्राट टाईम्स

**नाशिक । प्रतिनिधी:** शहरातील रस्त्यांवरील खड्डे आणि दुरवस्थेचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नाशिक दौऱ्यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी याच मुद्द्यावरून मिश्कील टोला लगावला. "मुख्यमंत्री नाशिकला आल्यामुळे आज रस्ते टकाटक झाले आहेत. त्यांनी महिन्यातून एकदा नाशिकला यायला पाहिजे," अशी कोपरखळी भुजबळ यांनी लगावली. त्यांच्या या वक्तव्याने कार्यक्रमस्थळी उपस्थितांमध्ये हशा पिकला, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हे वक्तव्य मिश्कीलपणे घेतल्याचे वृत्त आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उप-परिसराच्या प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नाशिक दौऱ्यावर आले होते. या कार्यक्रमाला मंत्री छगन भुजबळ यांच्यासह मंत्री गिरीश महाजन आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी भुजबळ यांनी नाशिकच्या रस्त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत मुख्यमंत्र्यांचे आभारही मानले. मुख्यमंत्री नाशिकला मोटारीने आल्याचा संदर्भ देत भुजबळ म्हणाले की, नाशिककरांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री रस्त्याने आले, त्याबद्दल त्यांचे आभार. त्यांच्या दौऱ्यामुळे शहरातील रस्त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी सरकारी यंत्रणा सक्रिय झाली. ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याची काळजी घेण्यात आली, असेही त्यांनी मिश्कीलपणे नमूद केले. नाशिकमधील खड्ड्यांचा प्रश्न यंदाच्या पावसाळ्यात विशेष चर्चेत आला आहे. खराब रस्त्यांमुळे नागरिकांना होणारा त्रास, वाहतुकीतील अडथळे आणि अपघातांचा धोका यावरून सत्ताधारी तसेच विरोधकांकडूनही प्रशासनावर टीका होत आहे. याच पार्श्वभूमीवर महायुती सरकारमधील मंत्री असलेल्या भुजबळांनी थेट व्यासपीठावरून रस्त्यांच्या स्थितीवर भाष्य केल्याने राजकीय चर्चा रंगली.

# गणेशोत्सवातील डीजेवरील बंदी उठवा; अन्यथा उपासमारीची वेळ येईल!

## धुळे जिल्हा साउंड व डीजे चालक-मालक संघटनेचे पोलीस प्रशासनाला निवेदन



जन सम्राट टाईम्स

**धुळे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात डीजे व ध्वनिवर्धकांवर घालण्यात आलेली बंदी तात्काळ उठवावी, अन्यथा या व्यवसायावर अवलंबून असलेल्या चालक, मालक आणि कामगारांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल, अशी आर्त मागणी धुळे जिल्हा साउंड व डीजे चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षकांसोबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख सण असून, या काळात विविध मंडळांकडून सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांमध्ये साउंड आणि डीजे व्यवसायाला मोठी मागणी असते. मात्र, यंदा धुळे जिल्ह्यात डीजेवर बंदी घालण्यात आल्याने या व्यवसायावर अवलंबून असलेल्या चालक-मालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. बंदीचा फेरविचार करून शासनाने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियम व अटींच्या अधीन राहून व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

धुळे शहरासह जिल्ह्यात रोजगाराच्या मर्यादित संधी असल्याने अनेक तरुणांनी साउंड आणि डीजे व्यवसायाचा आधार घेतला आहे. काही व्यावसायिकांनी बँकांकडून कर्ज घेऊन डीजेची उपकरणे खरेदी करून व्यवसाय सुरू केला आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, विवाह समारंभ तसेच विविध सामाजिक कार्यक्रमांमधून मिळणाऱ्या कामावर त्यांचा आर्थिक उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे उत्सवाच्या काळातच व्यवसायावर निर्बंध आल्यास कर्जाचे हप्ते, उपकरणांचा खर्च आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण होणार असल्याचे चालक-मालकांचे म्हणणे आहे. एका डीजेच्या व्यवसायावर चालक, ऑपरेटर, तंत्रज्ञ तसेच अन्य स्वरूपात चार ते पाच कुटुंबांचा उदरनिर्वाह होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे डीजेवरील बंदीचा परिणाम केवळ मालकांपुरता मर्यादित न राहता संबंधित कामगार आणि त्यांच्या कुटुंबांवरही होणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# संघर्षशील नेते राजू भाऊ राठोड यांचे निधन; सोयगाव तालुक्यावर शोककळा

## अल्पशा आजाराने वयाच्या प्रवासाला विराम; उद्या हनुमंत खेडा येथे अंत्यसंस्कार

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव/हनुमंत खेडा | प्रतिनिधी :** येथील सर्वसमाजप्रिय, संघर्षशील नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी जिल्हा प्रमुख राजू भाऊ राठोड यांचे २ सप्टेंबर २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच सोयगाव तालुक्यासह हनुमंत खेडा परिसरात शोककळा पसरली. त्यांच्या पार्थिवावर उद्या, ३ सप्टेंबर रोजी हनुमंत खेडा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

राजू भाऊ राठोड यांनी अत्यंत सामान्य कुटुंबातून आपल्या सामाजिक व राजकीय प्रवासाला सुरुवात केली. संघर्ष, जिद्द आणि लोकांशी असलेला जिव्हाळा या बळावर त्यांनी राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पदापेक्षा माणसांना जोडण्याला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यामुळेच सर्वसामान्य नागरिक, तरुण, कार्यकर्ते आणि विविध समाजघटकांमध्ये त्यांचा मोठा जनसंपर्क निर्माण झाला होता.



त्यांच्या राजकीय कारकिर्दीत तालुका अध्यक्षपदापासून दोन वेळा जिल्हा परिषद सदस्य, सभापती तसेच जिल्हा प्रमुखपदापर्यंत त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या. संघटन कौशल्य, आक्रमक कार्यपद्धती आणि निर्भीड नेतृत्वासाठी ते परिचित होते. कोणतीही राजकीय अथवा सामाजिक भूमिका घेताना त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला.

शिवसेनेच्या विचारसरणीने प्रेरित होऊन त्यांनी राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग घेतला. मात्र, राजकारण करत असताना त्यांनी जात, धर्म किंवा समाजाच्या चौकटीत स्वतःला मर्यादित ठेवले नाही. बंजारा समाजात जन्माला आलेले राठोड हे सर्व समाजातील नागरिकांशी आपुलकीचे संबंध ठेवत. त्यामुळेच अनेकांच्या दृष्टीने ते केवळ एका समाजाचे नव्हे, तर सर्वांचे 'भाऊ' बनले होते.

तरुणांना संघटित करणे, नव्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे आणि अडचणीच्या काळात कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे, ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये मानली जात. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना त्यांनी वेळोवेळी आवाज दिला. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे आणि संघर्षशील स्वभावामुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रात त्यांचा प्रभाव निर्माण झाला होता.

सोयगावला स्वतंत्र विधानसभा मतदारसंघाची संधी मिळाली असती, तर राजू भाऊ राठोड यांच्या नेतृत्वाला मोठी राजकीय संधी मिळाली असती, अशी भावना त्यांच्या निकटवर्तीयांकडून आणि समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, त्यांच्या अकाली निधनाने ही शक्यता कायमची अपूर्ण राहिली.

त्यांच्या निधनाने एक संघर्षशील, सर्वसमावेशक आणि माणसे जोडणारे नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांचे विचार, संघर्षाची भूमिका, कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते आणि सामाजिक बांधिलकी त्यांच्या स्मृती कायम जिवंत ठेवतील. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, असंख्य कार्यकर्ते आणि चाहते असा मोठा परिवार आहे.

# मृत शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमाफीचा लाभ द्या

## फार्मर आयडी व KYCची सक्ती रद्द करा; कागदपत्रांच्या जंजाळातून वारसांची मुक्तता करण्याची शेतकरी वर्गाची मागणी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेत पात्र ठरलेल्या, मात्र योजनेची अंमलबजावणी होण्यापूर्वी निधन झालेल्या शेतकऱ्यांच्या कायदेशीर वारसांनाही कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. मृत कर्जदार शेतकऱ्यांच्या वारसांना केवळ कागदपत्रांच्या अटी व तांत्रिक प्रक्रियेमुळे कर्जमाफीपासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

मृत शेतकऱ्यांच्या सर्व पात्र कायदेशीर वारसांना कर्जमाफीचा लाभ मिळावा, तसेच वारसांसाठी फार्मर आयडी आणि KYCची सक्ती रद्द करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मृत शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी किंवा KYC करणे शक्य नसल्याने त्यांच्या कायदेशीर वारसांची नोंदणी ग्राह्य धरावी, अशी मागणीही पुढे आली आहे.

कर्जमाफीचे निकष व कागदपत्रांच्या अटी सोप्या करा

कर्जमाफीसाठी पात्रतेचे निकष अधिक सुलभ करावेत आणि अनावश्यक कागदपत्रांच्या अटी रद्द कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गाने केली आहे. कर्जाचा कालावधी किंवा कर्जाच्या स्थितीबाबत अनाठायी बंधने न ठेवता पात्र शेतकऱ्यांना आणि त्यांच्या वारसांना तातडीने दिलासा द्यावा, असेही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

सातबारा उताऱ्यावर मयत कर्जदाराच्या वारसाचे नाव नोंदलेले असल्यास त्यांना तात्काळ कर्जमाफीचा लाभ द्यावा. ज्या वारसाचे नाव सातबाऱ्यावर नसेल, अशा प्रकरणात संबंधित वारसाकडून प्रतिज्ञापत्र घेऊन त्याला लाभ देण्याची सोपी प्रक्रिया निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

वारस नोंदणीसाठी विशेष मुदतवाढ द्यावी

मृत शेतकऱ्यांच्या वारसांना कर्जमाफी योजनेचा लाभ घेता यावा यासाठी वारस नोंदणीसाठी विशेष मुदतवाढ देण्यात यावी. तसेच राज्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँका, सहकारी बँका आणि अन्य वित्तीय संस्थांना याबाबत स्पष्ट व एकसमान सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गाने केली आहे.

यासाठी शासनाने तातडीने शासन निर्णय अथवा परिपत्रक काढून संपूर्ण राज्यात एकसमान पद्धतीने अंमलबजावणी करावी. विविध बँकांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने कागदपत्रांची मागणी होऊ नये, यासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

'पात्र शेतकरी किंवा वारस वंचित राहता कामा नये'

कर्जमाफी योजनेत पात्र असलेल्या शेतकऱ्याचा योजनेच्या अंमलबजावणीपूर्वी मृत्यू झाला असेल, तर केवळ त्याच्या निधनामुळे त्याच्या कुटुंबाला कर्जमाफीपासून वंचित ठेवणे योग्य नाही. आधीच कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनाचे दुःख असताना कागदपत्रांच्या अटींच्या जंजाळात वारसांना अडकवणे म्हणजे 'जखमेवर मीठ चोळण्यासारखे' असल्याची भावना मृत शेतकऱ्यांच्या वारसांकडून व्यक्त होत आहे.

राज्य सरकारने सर्वात मोठी कर्जमाफी जाहीर केल्याचा गाजावाजा करण्यापेक्षा प्रत्यक्षात एकही पात्र शेतकरी किंवा त्याचा कायदेशीर वारस कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची हमी द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात आली आहे.



### प्रमुख मागण्या

- मृत शेतकऱ्यांच्या सर्व पात्र कायदेशीर वारसांना कर्जमाफीचा लाभ द्यावा.
- वारसांसाठी फार्मर आयडी व KYCची सक्ती रद्द करावी.
- कर्जमाफीची पात्रता प्रक्रिया सुलभ करावी.
- अनावश्यक कागदपत्रांच्या अटी रद्द कराव्यात.
- मृत शेतकऱ्यांच्या वारस नोंदणीसाठी विशेष मुदतवाढ द्यावी.
- सातबाऱ्यावर वारसाचे नाव असल्यास तात्काळ कर्जमाफी मंजूर करावी.
- नाव नसलेल्या वारसांकडून प्रतिज्ञापत्र घेऊन लाभ देण्याची व्यवस्था करावी.
- सर्व बँका व वित्तीय संस्थांना एकसमान स्पष्ट सूचना द्याव्यात.
- यासाठी तातडीने शासन निर्णय अथवा परिपत्रक काढून राज्यभर अंमलबजावणी करावी.

# पावसाने दगा दिला अन् शेतकऱ्याने उभ्या कापसावर फिरवला रोटाव्हेटर!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी |** पावसाळ्याच्या दिवसांतही गेल्या दीड महिन्यापासून पावसाने पाठ फिरवल्याने जामनेर तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. पावसाअभावी उभ्या पिकांची अवस्था बिकट झाली असून, पिकांना वाचवण्यासाठी शेतकऱ्यांकडून आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. मात्र, पाण्याअभावी पीक वाचवणे अशक्य झाल्याने होळहवेली तांडा येथील शेतकरी रमेश पवार यांनी तब्बल चार एकर उभ्या कापूस पिकावर रोटाव्हेटर फिरवून पीक नष्ट केले. डोळ्यादेखत उभे पीक जमीनदोस्त करण्याची वेळ आल्याने शेतकऱ्याच्या हतबलतेचे हे चित्र समोर आले आहे.

रमेश पवार यांनी मोठ्या आशेने आपल्या चार एकर क्षेत्रात कापसाची लागवड केली होती. यंदा चांगला पाऊस होईल आणि कापसातून समाधानकारक उत्पन्न मिळेल, या अपेक्षेने त्यांनी पिकाची मेहनतीने मशागत केली. सुरुवातीच्या काळात पिकाची वाढही समाधानकारक होती. मात्र, त्यानंतर पावसाने अचानक दडी मारल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत गेली. गेल्या दीड महिन्यापासून परिसरात अपेक्षित पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला. कापूस पिकाची वाढ खुंटू लागली. पीक वाचवण्यासाठी पवार यांनी उपलब्ध पाण्याचा आधार घेत बादलीने पाणी देण्यास सुरुवात केली. मरगळलेल्या कापूस पिकाला जीवदान देण्यासाठी त्यांनी शक्य ते सर्व प्रयत्न केले. मात्र, पाण्याची उपलब्धता अत्यल्प असल्याने संपूर्ण चार एकर क्षेत्राला पुरेसे पाणी देणे शक्य झाले नाही. दरम्यान, वाढत्या उन्हामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली. पाण्याअभावी कापसाची झाडे सुकू लागली आणि हाताशी आलेले पीक डोळ्यादेखत वाळून जाऊ लागले. शेतीवर केलेला खर्च, मजुरी, बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च लक्षात घेता पीक वाचवण्यासाठी आणखी खर्च करणेही शक्य नव्हते.



ब्रेक न्यूज

# पाचोरा येथे वंचित बहुजन आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

## पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती




जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** जळगाव लोकसभा मतदारसंघातील पाचोरा तालुक्यात दि. १ सप्टेंबर रोजी वंचित बहुजन आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. पाचोरा-भडगाव मतदारसंघातील गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने या कार्यालयाची सुरुवात करण्यात आली.

श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि आशीर्वादाला केंद्रस्थानी ठेवून जनसेवेच्या उद्देशाने पाचोरा येथे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. मतदारसंघातील नागरिकांना विविध शासकीय योजना, मूलभूत सुविधा तसेच त्यांच्या दैनंदिन अडचणींबाबत मार्गदर्शन व मदत मिळावी, यासाठी कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. वंचितांच्या प्रश्नांसाठी व्यासपीठ वंचित, शोषित आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी आवाज उठविणे, त्यांच्या समस्या संबंधित प्रशासनापर्यंत पोहोचविणे तसेच प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करणे, हा जनसंपर्क कार्यालयाचा प्रमुख उद्देश असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

पाचोरा-भडगाव मतदारसंघातील जनतेने आपल्या समस्या व अडचणी घेऊन कार्यालयाशी संपर्क साधावा. जनतेच्या प्रश्नांसाठी हे कार्यालय सदैव तत्पर राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती

याप्रसंगी जिल्हा महासचिव अमित भाऊ तडवी, जिल्हा उपाध्यक्ष हरिश्चंद्र सोनवणे सर, जिल्हा उपाध्यक्ष प्रीतीलाल पवार सर, जिल्हा युवक अध्यक्ष जितेंद्र भाऊ केदार, जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाऊ लोंढे, पाचोरा तालुका अध्यक्ष संदीप भाऊ जाधव, महासचिव अमोल अहिरे तसेच पाचोरा तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेशी थेट संवाद वाढवून त्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# जळगावात स्पाच्या नावाखाली देहव्यापाराचा पर्दाफाश; ६ तरुणींची सुटका

## भवितव्य विषयावरील वक्तृत्व स्पर्धेत उल्लेखनीय यश

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी ।** जळगाव शहरातील एका नामांकित स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित अवैध देहव्यापाराचा जळगाव पोलिसांच्या दामिनी पथकाने पर्दाफाश केला. या कारवाईत स्पा सेंटरमधून ६ तरुणींची सुटका करण्यात आली असूनजिल्हा पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जळगाव शहरातील रिंगरोड परिसरात असलेल्या एका स्पा सेंटरमध्ये गैरप्रकार सुरू असल्याची गोपनीय माहिती दामिनी पथकाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी काही दिवस स्पावर पाळत ठेवून माहितीची खातरजमा केली. तसेच डमी ग्राहक पाठवून स्टिंग ऑपरेशन करण्यात आले. यावेळी गैरप्रकाराचे चित्रीकरण करून पुरावे संकलित करण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी अचानक छापा टाकला.



या कारवाईत स्पा सेंटरमधून ६ तरुणींची सुटका करण्यात आली. यामध्ये पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग, मणिपूरमधील तामेंगलोंग, पूर्व सिक्कीम तसेच नेपाळमधील बांके येथील तरुणींचा समावेश आहे. या सर्व तरुणी स्पामध्ये मसाज थेरपिस्ट म्हणून काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, सुटका करण्यात आलेल्या तरुणींमध्ये नेपाळमधील एका तरुणीचाही समावेश असल्याने पोलिसांनी तिच्या पासपोर्ट, व्हिसा तसेच भारतात प्रवेश करण्याच्या वैधतेबाबत तपास सुरू केला आहे. या प्रकरणात नीरज सिंग पंड्या (रा. मुखर्जी नगर, रतलाम, मध्य प्रदेश) हा स्पाचा चालक व परवानाधारक, तर राजेंद्र पुंडलिकराव चव्हाण (रा. यशवंत कॉलनी, रिंग रोड, जळगाव) हा जागा मालक व परवानादाता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

### कारवाईत सहभागी पोलीस पथक

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई यशस्वी करण्यात आली. दामिनी पथकातील महिला पोलीस हवालदार वैशाली किशोर माळी, महिला पोलीस कॉन्स्टेबल मोनु उत्तम घुले, अंजली नवलसिंग राजपूत, रीना महाजन, आरसीपी जवान ज्ञानेश्वर विठ्ठल पाटील आणि अतीन संतोष थोरात यांनी कारवाईत सहभाग घेतला. या कारवाईत नितीन गणापुरे, सह्याद्री बिर्ले, जिल्हा पेठ पोलीस ठाण्याचे API अनिल वाघ, API माधुरी बोरसे, PSI दिनेश बडगुजर, PSI राजेश पाटील, ASI अनिल पाटील आणि ASI भूषण कोल्हे यांच्यासह पोलीस अंमलदारांनी सहभाग घेतला.

# नाहाटा महाविद्यालयात 'रानभाजी महोत्सवा'चे आयोजन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । (प्रतिनिधी) :** भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी 'रानभाजी महोत्सव – ओळख, आरोग्य आणि पाककला' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. रानभाज्यांची ओळख, त्यांचे आरोग्यदायी महत्त्व तसेच त्यापासून तयार होणाऱ्या विविध पाककृतींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

पावसाळ्यात, विशेषतः श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या रानभाज्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असून, त्या आपल्या आहारासाठी वरदान ठरतात. शरीरासाठी आवश्यक असलेल्या विविध पोषक घटकांचा खजिना रानभाज्यांमध्ये असतो. त्यामुळे रानभाज्यांचा आहारात समावेश करणे गरजेचे असून, त्यांच्या पारंपरिक पाककृती विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांकडून तसेच कुटुंबातील ज्येष्ठांकडून शिकून घ्याव्यात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे यांनी केले.

यावेळी प्राचार्य डॉ. बऱ्हाटे यांनी बालपणी खाल्लेल्या दोडी, अळूची वळी आणि कटूर्ले या रानभाज्यांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच वनस्पतीशास्त्र विभागाने नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल विभागाचे कौतुक केले.



### रानभाज्यांच्या पाककृतींची मेजवानी

रानभाजी महोत्सवानिमित्त विविध रानभाज्यांचे प्रदर्शन तसेच त्यांच्या पाककृतींचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध रानभाज्यांपासून तयार केलेल्या रुचकर पाककृती प्रदर्शनासाठी आणल्या. उंबर, सराटा, पानांचा ओवा, शेवगा, आघाडा, अंबाडी, चिवळ, अळू, कटूर्ले आदी विविध रानभाज्यांपासून विद्यार्थ्यांनी आकर्षक व चविष्ट पाककृती तयार केल्या. यासोबतच संबंधित रानभाज्यांची शास्त्रीय नावे, त्यांचे उपयोग, आरोग्यविषयक महत्त्व तसेच पाककृतीची सविस्तर माहिती उपस्थितांना देण्यात आली. उपस्थितांनी विविध पाककृतींचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. विविध शा ंतील विद्यार्थ्यांचा सहभाग वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसोबतच महाविद्यालयातील इतर विषयांच्या विद्यार्थ्यांनीही या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामुळे रानभाज्यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासोबतच पारंपरिक आहारपद्धतींचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यशाळेस प्राचार्य डॉ. बी. एच. बऱ्हाटे, उपप्राचार्य डॉ. डी. एन. पाटील, उपप्राचार्य डॉ. जी. आर. वाणी, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सौ. विद्या पाटील, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. जे. जाधव यांच्यासह महाविद्यालयातील विविध विषयांचे प्राध्यापक उपस्थित होते. त्यांनी रानभाज्यांची माहिती जाणून घेत त्यांच्या पाककृतींचा आस्वाद घेतला.

# नशिराबाद पोलिसांची धडक कारवाई; साडेतीन किलो गांजासह दोघांना अटक

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री, साठवणूक व वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असताना नशिराबाद पोलिसांनी साथी बाजार चौकात धडक कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून सुमारे साडेतीन किलो गांजा आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण २ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अंमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांविरोधात पोलिसांची मोहीम अधिक तीव्र झाल्याचे दिसून येत आहे.



पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नशिराबाद पोलीस ठाण्याच्या पथकाला साथी बाजार चौक परिसरात अंमली पदार्थांची देवाणघेवाण होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयित व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवले. संशयास्पद हालचाली आढळून आल्यानंतर दोन इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे बेकायदेशीर गांजा आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले.

या कारवाईत राजेश बाटुंग (वय ३१, रा. तांबापुरा, जळगाव) आणि सुभाष मराठे (वय ६८, रा. साथी बाजार चौक, नशिराबाद) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातून अंदाजे ३.५ किलो गांजा तसेच गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २ लाख ५३ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी नशिराबाद पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपींविरुद्ध अंमली पदार्थ आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (NDPS Act), १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अटक करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेला गांजा नेमका कुठून आणण्यात आला होता, त्यामागे कोणाचा सहभाग आहे तसेच हा साठा कोणाला वितरित केला जाणार होता, याचा तपास पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नशिराबाद पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे, पोलीस उपनिरीक्षक प्रिया दातीर यांच्यासह पोलीस हेड कॉन्स्टेबल गुणवंत देशमुख, प्रशांत विरणारे, चंद्रकांत पाटील तसेच पोलीस कॉन्स्टेबल भरत बाविस्कर, पंकज सोनवणे, प्रवीण लोहार, सागर बिडे आणि विठ्ठल मुंडे यांच्या पथकाने ही कारवाई केली. युवकांना अंमली पदार्थांच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी तसेच अवैध अंमली पदार्थांच्या व्यवहारांना आळा घालण्यासाठी पोलिसांची मोहीम सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# जिद्द, मेहनत अन् आत्मविश्वास; चोपडा बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी बोरअजंटीचे खेळाडू सज्ज!

## खो-खो, कबड्डीपासून धावणे, थाळीफेक, गोळाफेकपर्यंत विविध क्रीडा प्रकारांचा जोरदार सराव

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरअजंटी येथील विद्यार्थ्यांचा आदिवासी विकास विभाग, प्रकल्प कार्यालय, यावल अंतर्गत सप्टेंबर २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या चोपडा बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी जोरदार सराव सुरू आहे.

मा. प्रकल्प अधिकारी श्री. अरुण पवार यांच्या मार्गदर्शन व आदेशानुसार होणाऱ्या या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह असून, जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर विविध क्रीडा प्रकारांचा नियमित सराव केला जात आहे. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केला आहे.



विविध क्रीडा प्रकारांचा कसून सराव क्रीडा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांकडून खो-खो, कबड्डी, धावणे, थाळीफेक, गोळाफेक, लांब उडी, उंच उडी, व्हॉलिबॉल तसेच लहान व मोठ्या गटातील विविध क्रीडा प्रकारांचा सराव करून घेतला जात आहे.

विद्यार्थ्यांचा नियमित आणि शिस्तबद्ध सराव सुरू असून क्रीडा समितीचे प्रमुख व सदस्य वेळोवेळी खेळाडूंना मार्गदर्शन करीत आहेत. सरावाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण तसेच जिंकण्याची जिद्द निर्माण करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

शिक्षकांचे विशेष परिश्रम विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला योग्य दिशा मिळावी यासाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी एकजुटीने परिश्रम घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या सरावावर लक्ष ठेवून त्यांना आवश्यक मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले जात आहे. संस्थेचे मोलाचे सहकार्य विद्यार्थ्यांना आवश्यक क्रीडा साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र रायसिंग भादले, उपाध्यक्ष श्री. धनंजय रायसिंग भादले, सचिव श्री. ज्ञानेश्वर रायसिंग भादले, संचालक श्री. जितेंद्र रायसिंग भादले तसेच सर्व संचालक मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

मुख्याध्यापक, शिक्षक व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांच्या उत्साहाला सातत्याने प्रोत्साहन दिले जात असून, स्पर्धेत यश संपादन करण्यासाठी त्यांना मानसिक व क्रीडा कौशल्याच्या दृष्टीने तयार केले जात आहे. 'जिद्द आमची, मेहनत आमची अन् विजयाची वाटचालही आमची!' विद्यार्थ्यांना प्रेरणा देताना, "मेहनत, जिद्द आणि संघभावनेच्या बळावर यश निश्चितच मिळते. खेळाडूंनी आत्मविश्वासाने मैदानात उतरून आपले सर्वोत्तम कौशल्य दाखवावे आणि आपल्या शाळेचा गौरव वाढवावा," असे आवाहन करण्यात आले.

चोपडा बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेत विविध क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करून विजयी होण्याच्या उद्देशाने बोरअजंटी आश्रमशाळेचे खेळाडू सज्ज झाले आहेत.

# चाळीसगावात भरधाव कारने तिघा महिलांना उडविले; एकीचा जागीच मृत्यू, दोघी गंभीर

## अज्ञात चोरट्याविरुद्ध निंभोरा पोलिसांत गुन्हा

जन सम्राट टाईम्स

चाळीसगाव । प्रतिनिधी । तालुक्यातील बिलाखेड गावाजवळ भरधाव कारने रस्त्याने जाणाऱ्या तीन महिलांना जोरदार धडक दिल्याची धक्कादायक घटना १ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ९ वाजता घडली. या भीषण अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला असून, दोन महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तीन महिला रस्त्याने जात असताना भरधाव कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, एका महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अन्य दोन महिला गंभीर जखमी झाल्या. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यामुळे काही वेळातच घटनास्थळी मोठी गर्दी झाली.जळगाव इतिहास दरम्यान, या घटनेनंतर संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी घटनास्थळी रस्ता रोको आंदोलन सुरू केले. अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला. घटनेची माहिती मिळताच चाळीसगाव शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ग्रामस्थांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. अपघातामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा तपास चाळीसगाव शहर पोलीस करत आहेत.

